वाचा:-

१) श्री.आनंद जगदिशप्रसाद गुप्ता रा.लोणेरे, ता.माणगांव,जि.रायगड यांचा अर्ज दिनांक १८/०६/२०१४.

२) या कार्यालयाकडील आदेश क्र.मशा/एल.एन.ए.१(ब)/एस.आर.२२४/२००९ दि.२९/१२/२०१०.

३) या कार्यालयाकडील आदेश क्र.मशा/एल.एन.ए.१(ब)/प्र.क्र.१३९/२०१२ दिनांक १५/०६/२०१३.

४) तहसिलदार माणगांव यांजकडील पत्र क्र.जमीन/कात-१/बिनशेती/टो.नं.९७४३/१४ दिनांक १६/१०/२०१४.

५) सहाय्यक संचालक,नगर रचना,रायगड अलिबाग यांजकडील पत्र जा.क्र.ससंनर-राअ/बि.शे./ बांप/मौजे लोणेरे/ता.माणगांव/स.नं.५१/१ व इतर/४६८१ दिनांक १५/१२/२०१४.

६) उप अधिक्षक,भूमी अभिलेख,माणगाव यांजकडील अतितातडी बि.शे.मो.र.नं.४७/२८.०५.२०१० दिनांक २४/०६/२०१० च्या मोजणी नकाशाची प्रत.

७) महाराष्ट्र जमीन महसूल(जमीनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम, १९६९

८) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ व त्याखालील नियम

९) शासन महसूल व वन विभागाकडील राजपत्र दिनांक २२/८/२०१४

१०)या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.मशा/एल.एन.ए.१(अ) व (ब)/अधिकार/२०१४, दिनांक ९/१२/२०१४

११)महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ अ व त्याखालील नियम

१२)या कार्यालयाकडील मंजूर टिपणी दिनांक १२/२/२०१५.

क्रमांक मशा /एल.एन.ए.१(ब)/प्र.क्र.८१/२०१४
जिल्हाधिकारी रायगड यांचे कार्यालय
अलिबाग दिनांक :- १२/०२/२०१५.

आदेश

श्री.आनंद जगदिशप्रसाद गुप्ता रा.लोणेरे यांनी मौजे लोणेरे, तालुका माणगांव येथील स.न.५१ प्लॉट नं.१ ते ७६ व १५-०० चौ.मी.अनबिल्टेबल क्षेत्र असे एकूण क्षेत्र ३-०९-३ हे.आर या जागेत वाढीव बांधकामास परवानगी मिळणेबाबत दि.१८/०६/२०१४ रोजी अर्ज केलेला आहे.

मौजे लोणेरे, ता.माणगांव येथील खालील वर्णनाच्या जमीनीची श्री.आनंद जगदिशप्रसाद गुप्ता यांना या कार्यालयाकडील आदेश क्र.मशा/एल.एन.ए.१(ब)/एस.आर.२२४/२००९ दिनांक २२/१२/२०१० अन्वये (प्लॉट पाडून) निवासी व पुरक वाणिज्य या कारणासाठी बिनशेती परवानगी देणेत आली आहे.

स.नं.	हि.नं.	क्षेत्र(हे.आर.)	आकार रु.पैसे
५०	४ब	०-३७-०	१-७१
५१	०	०-५३-६	३-५९
५२	१	०-६०-७	६-०६
५२	२ब	०-३०-०	१-९३
१४७	८/१	०-२८-०	०-२४
१४७	८/२	०-१३-०	०-१२
१४७	८/३	०-१२-०	०-०९
१४७	८/४	०-१२-०	०-०९
१४७	९अ	०२९-०	०-२६
१४७	९ब	०-२८-०	०-२६
१४७	१०	०-०६-०	०-०६
		३-०९-३	

या कार्यालयाकडील आदेश क्र.मशा/एल.एन.ए.१(ब)/प्र.क्र.१३९/२०१२ दि.१५/०६/ २०१३ अन्वये श्री.आनंद जगदिशप्रसाद गुप्ता यांना मौजे लोणेरे, ता.माणगाव येथील स.नं.५१ प्लॉट नं.१ ते ७६ व १५.०० चौ.मी. अनबिल्टबेल क्षेत्र असे एकूण क्षेत्र ३-०९-३ हे.आर जागेच्या सामिलीकरणासह निवासी या कारणासाठी बांधकामास परवानगी देण्यात आलेली आहे.

उप अधिक्षक,भूमी अभिलेख माणगांव यांजकडील भूमापन अतितातडी वि.शे.मो.र. नं.४७/२८.०५.२०१० दिनांक २४/०६/२०१० अन्वये सदर जागेची मोजणी झालेली असून मोजणी नकाशाची प्रत अर्जदार यांनी सादर केली आहे.

सदरची जागा अर्जदार श्री.आनंद जगदिशप्रसाद गुप्ता यांच्या नावे हक्कनोंदीस दाखल आहे.

प्रस्तुत प्रकरणी तहसिलदार माणगांव यांजकडील पत्र दिनांक १६/१०/२०१४ अन्वये, सदर जमीन श्री.आनंद जगदिशप्रसाद गुप्ता यांचे नावे दाखल असून त्यांनी उपरोक्त नमूद जमिनीची बिनशेती (बांधकाम/सुधारीत रेखांकनासाठी) परवानगी मिळणेकामी अर्ज केला आहे. सदर जमीन अर्जदारांचे मालकी हक्काची असून त्यांचे प्रत्यक्ष ताबेकब्जात आहे. सदरची जमीन कुळ कायदा कलम ४३ ची नाही अगर इनाम नाही. तसेच जमिनीत कुळ नाहीत. सदरचे जमिनीवर कोणत्याही प्रकारचा कर्जाचा बोजा नाही. सदरची जमीन ग्रामपंचायत लोणेरे यांचे कार्यक्षेत्रात येत आहे. सदरची जमीन संपादनाखाली येत नाही. सदरची जमिन विकास कार्यासाठी राखून ठेवलेली नाही. सदर क्षेत्राची मा.जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांचेकडील आदेश क्र.मशा /एल.एन.ए.१(ब)/प्र.क्र.१३९/२०१२ दि.१५/०६/२०१३ अन्वये उपरोक्त जमिनीची निवासी व वाणिज्य कारणासाठी बिनशेती परवानगी देण्यात आली आहे. सदरचे जमिनीशी इतर कोणाचाही हक्क संबंध नाही. सांडपाणी वाहून जाणेसाठी गटाराची व पिण्याच्या पाण्याची सोय स्वत:चे खर्चाने करणार आहेत. उपरोक्त नमूद जमिनीमध्ये अर्जदार यांनी बांधकाम केलेले नाही. सदर क्षेत्रावर आज रोजी झाडे नाहीत. सदरचे जागेवर अर्जदार विटा वगैरे पाडणार नाहीत. सदर जागेचा उपयोग अर्जदार सर्व्हीस स्टेशनसाठी किंवा सिनेमागृहासाठी करणार नाहीत. सदरचे जमिनीवरुन उच्च दाबाच्या अगर कमी दाबाची विद्युतवाहिनी गेलेली नाही. सदर जमिनीखालून गटार अगर पाण्याची लाईन जात नाही. तसेच गॅस पाईपलाईन गेलेली नाही. सदरचे जागेमध्ये जाणे येणेसाठी राष्ट्रीय महामार्ग क्र.१७ पासून स्वत:चे मालकीचा अंतर्गत रस्ता आहे. जागेच्या लगतच्या मंजूर बिनशेती रेखांकनातुन रस्ता प्रस्तावित केलेला नाही. सदर जमिनीतुन लगतच्या जमिनीत जाण्या-येण्यासाठी गावनकाशावर रस्ता दाखविलेला आहे. बिनशेती जागेपासून ५०० मीटर अंतरावर अगर या गावात पुरातत्व विभागाची वास्तू नाही. सदरचे जागेतून अगर जागेलगत तुरुंग, रेल्वे लाईन, सैनिकी कॅम्प,नदी,नाला जात नाही. सदर जमिनीत अथवा तिचा काही भाग अन्य व्यक्तीचे अतिक्रमणाखाली येत नाही. सदर जमिनीत वन संरक्षण कायद्याच्या तरतुदी लागू होत नाही. सदरची जमीन आदिवासीकडून मिळालेली नाही अगर पुनर्वसनासाठी राखून ठेवलेली नाही. सदर जमिन इकोसेन्सेटिव्ह झोनमध्ये येत नाही. सदर जमिनीस सी.आर.झेड व यु.एल.सी.कायद्याच्या तरतुदी लागू नाहीत. सदर जमीन एम.एम.आर.डी.ए.कार्यक्षेत्रात येत नाही. सदरची जमीन समुद्र अगर खाडी किनारी नाही. सदर जमिनीत कांदळवन सदृश्य वनस्पती नाही. सदरचे जमिनीत भराव करावा लागणार नाही. सदरची जमीन सरकारी अगर सार्वजनिक कामासाठी राखून ठेवलेली नाही, असे कळविले आहे.

सहाय्यक संचालक,नगर रचना,रायगड-अलिबाग यांनी त्यांचेकडील पत्र दि.१५/१२/२०१४ अन्वये, मौजे लोणेरे, ता.माणगाव येथील स.नं.५१ हि.नं.१, २ व इतर एकूण क्षेत्र ३०९३०.०० चौ.मी. क्षेत्रास निवासी कारणासाठी सुधारीत वाढीव बांधकामास परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव अभिप्रायार्थ कार्यालयात सादर आहे.

भुखंड निहाय क्षेत्र तपशिल

अ.क्र.	स.नं./भु.क्र.	क्षेत्र (हे.आर)	मालकी
१	५१/१	०-०२-६५	
२	५१/२	०-०२-९०	
३	५१/३	०-०३-००	
४	५१/४	०-०४-४०	
५	५१/५	०-०२-२०	
६	५१/६	०-०२-६०	
७	५१/७	०-०२-६०	
८	५१/८	०-०२-५५	
९	५१/९	०-०२-५५	
१०	५१/१०	०-०२-२०	
११	५१/११	०-०२-१५	

१२	५१/१२	०-०२-२५	आनंद जगदिशप्रसाद गुप्ता
१३	५१/१३	०-०२-३०	
१४	५१/१४	०-०२-३५	
१५	५१/१५	०-०२-८०	
१६	५१/१६	०-०२-६०	
१७	५१/१७	०-०२-६०	
१८	५१/१८	०-०२-५५	
१९	५१/१९	०-०२-५०	
२०	५१/२०	०-०३-५०	
२१	५१/२१	०-०४-७०	
२२	५१/२२	०-०२-९०	
२३	५१/२३	०-०३-००	
२४	५१/२४	०-०२-२०	
२५	५१/२५	०-०२-१५	
२६	५१/२६	०-०२-२५	
२७	५१/२७	०-०२-३०	
२८	५१/२८	०-०२-४०	
२९	५१/२९	०-०२-२५	
३०	५१/३०	०-०२-१५	
३१	५१/३१	०-०२-४५	
३२	५१/३२	०-०२-२०	
३३	५१/३३	०-०२-०	
३४	५१/३४	०-०२-२५	
३५	५१/३५	०-०२-१०	
३६	५१/३६	०-०१-९०	
३७	५१/३७	०-०१-८०	
३८	५१/३८	०-०१-६५	
३९	५१/३९	०-०१-९०	
४०	५१/४०	०-०२-१५	
४१	५१/४१	०-०२-२५	
४२	५१/४२	०-०२-४०	
४३	५१/४३	०-०२-६५	
४४	५१/४४	०-०२-८५	
४५	५१/४५	०-०२-७०	
४६	५१/४६	०-०३-१०	
४७	५१/४७	०-०२-९०	
४८	५१/४८	०-०३-८०	
४९	५१/४९	०-०२-१०	
५०	५१/५०	०-०२-१५	
५१	५१/५१	०-०२-४०	आनंद जगदिशप्रसाद गुप्ता
५२	५१/५२	०-०३-२५	
५३	५१/५३	०-०२-७५	
५४	५१/५४	०-०२-४५	
५५	५१/५५	०-०२-५०	
५६	५१/५६	०-०२-०	
५७	५१/५७	०-०२-०	

५८	५१/५८	०-०१-९०	
५९	५१/५९	०-०२-२५	
६०	५१/६०	०-०२-२०	
६१	५१/६१	०-०२-७५	
६२	५१/६२	०-०२-०	
६३	५१/६३	०-०१-८०	
६४	५१/६४	०-०२-१०	
६५	५१/६५	०-०२-१०	
६६	५१/६६	०-०२-५०	
६७	५१/६७	०-०२-४०	
६८	५१/६८	०-०२-६०	
६९	५१/६९	०-०२-६०	
७०	५१/७०	०-०२-२०	
७१	५१/७१	०-१६-१०	
७२	५१/७२	०-२९-४०	आनंद जगदिशप्रसाद गुप्ता मोकळी जागा
७३	५१/७३	०-१४-७०	आनंद जगदिशप्रसाद गुप्ता ॲमेनिटी स्पेस
७४	५१/७४	०-०७-९०	आनंद जगदिशप्रसाद गुप्ता रस्ता रुंदीकरण
७५	५१/७५	०-०७-३०	आनंद जगदिशप्रसाद गुप्ता सर्व्हिस रोड
७६	५१/७६	०-६०-१५	आनंद जगदिशप्रसाद गुप्ता अंतर्गत रस्त्याचे क्षेत्र
७७	A	०-००-१५	
एकूण क्षेत्र	३-०९-३ हे.आर		

प्रस्तायासोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, मंजुर रायगड प्रादेशिक योजने अंतर्गत मंजूर गोरेगांव परिसर विकास केंद्राच्या नकाशातील प्रस्तावानुसार प्रस्तुत जागा रहिवास भूवापर विभागात समाविष्ट आहे. तसेच सदर गाव सिआरझेड अधिसुचित क्षेत्राच्या बाहेर आहे. सदर प्रादेशिक योजनेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.७.१ मधील तरतुदीनुसार परिसर विकास केंद्रासाठी ब व क वर्ग नगर परिषदेचे नियम लागू आहेत. आता शासनाने दि.२१.११.२०१३ रोजी प्रादेशिक योजनांसाठी नविन विकास नियंत्रण नियमावली लागू केली असून त्यानुसार सदर प्रादेशिक योजनेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार जागेत निवासी वापर अनुज्ञेय होतो.सदर जागेचा उपअधिक्षक, भूमी अभिलेख, माणगाव यांस कडील मौजे लोणेरे,ता.माणगाव येथील स.नं.५०/४ब, ५१/०,५२/१,५२/२ब,१४७ हि.नं.८/१, ८/२,८/३,८/४,८/९अ,८/९,८/१० एकूण क्षेत्र ३.०९.३ हे. आर जागेच्या रेखांकनास मा.जिल्हाधिकारी, रायगड यांनी आदेश क्र.मशा/एलएनए-१(ब)/एसआर/ २२४/ २००९ दि.२१.१२.२०१० रोजी रेखांकनास अंतिम बिनशेती मंजुरी दिली आहे. सदर बिनशेतीकामी अर्जदार यांनी तात्पुरत्या रेखांकनाची मोजणी चा १:५०० प्रमाणाचा उपअधिक्षक भूमी अभिलेख यांच्याकडील अतितातडी वि.शे.मो.र.नं. ४७/२८.०५.२०१० मोजणी दि.२४.०६.२०१० अन्वये केली असून १:५०० प्रमाणाचा मोजणी नकाशा प्रकरणी समाविष्ट केला आहे. अर्जदार यांनी रेखांकन रद्द करुन समुह निवासी विकास अपेक्षिला आहे. मोजणी नकाशात स.क्र.५०/४ब, ५१, ५२/१, २ब, १४७/८/१ ते ४, ९ व १० चे पोटहिस्स्याच्या हद्दी दर्शविल्या आहेत. त्यावरुन रेखांकनातील जागेच्या हद्दी व अंतर्गत हद्दीची पडताळणी केली असता हद्दी जुळत आहेत.कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, पेण यांचेकडील पत्र क्र.रामवि/पेण/रेचिशा/नाहदा-२३१/८२९, दि.२६.०३.२०१० प्राप्त आहे. त्यामध्ये प्रस्तूत जागा पनवेल-महाड-पणजी राष्ट्रीय महामार्ग क्र.१७ या रस्त्याच्या लगत असल्याचे नमुद आहे. या राष्ट्रीय महामार्गा वरुन जागेस पोच मार्गासाठी बिनशेती प्रस्तावात यापुर्वीच नाहरकत

दाखला दिला आहे. शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्देश क्र.टिपीएस/१८०८/१२५४/ प्र.क्र.१२५७/नवि-१३ दि.१० .०२.२०१० अन्वये अर्जदार यांनी रक्कम रुपये ३७,०००/-, चलन क्र.५४, दि.०६.१२.२०१४ अन्वये रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया, अलिबाग शाखेत जमा केले आहे.

अ.क्र.	तपशिल	क्षेत्र (चौ.मी.)
१.	भुखंडाचे एकूण क्षेत्र	३०९३०.००
२.	वजा- राष्ट्रीय महामार्गासाठी रस्ता रुंदीचे क्षेत्र	७९०.००
३.	वजा - सेवा रस्ता क्षेत्र	७३०.००
४.	भुखंडाचे उर्वरीत क्षेत्र	२९४१०.००
५.	ॲमिनीटी स्पेस	१४७०.५०
६.	भुखंडाचे शिल्लक क्षेत्र	२७,९३९.५०
७.	अनुज्ञेय बांधपात्र क्षेत्र २७९३९.५० X ०.१०	२५१४५.५५
८.	प्रस्तावित बांधकाम क्षेत्र	१६४०४.१२

इमारतीचे प्रस्तावित बांधकाम क्षेत्र

इमारत टाईप क्र.	बांधकाम क्षेत्र चौ.मी.
A४	१०३६.४८X१=१०३६.४८
A५	९५१X१=९५१.००
A६	९५१X१=९५१.००
B१	९७४.८३X१=९७४.८३
B२	९७४.८३X१=९७४.८३
B३	९७४.८३X१=९७४.८३
C१	१३०५.५७X१=१३०५.५७
C२	१३०५.५७X१=१३०५.५७
C३	१३०५.५७X१=१३०५.५७
D१	१३१३.०६X१=१३१३.०६
D२	१३१३.०६X१=१३१३.०६
D३	१४०६.३२X१= १४०६.३२
वाणिज्य इमारत	२५९२.००X१ =२५९२.००
एकूण क्षेत्र	१६४०४.१२

सबब,अर्जदाराने सादर केलेल्या बांधकाम व स्थलदर्शक नकाशाप्रमाणे वरील भुखंडातील बांधकामास पत्रातील शर्तींना अधिन राहुन परवानगी देण्यास या कार्यालयाची शिफारस आहे,असे अभिप्राय देण्यात आले आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार विकास योजनेमध्ये समाविष्ट केलेल्या क्षेत्रात स्थित असलेल्या जमिनीच्या वापरात बदल करण्यासाठी परवानगीची आवश्यकता नसल्याबाबतचा अध्यादेश महसूल व वन विभागाने राजपत्रात दिनांक २२/८/२०१४ रोजी प्रसिध्द केला असून, त्यामध्ये वर्ग - १ च्या जमिनीबाबत संबंधित महसूल यंत्रणेची व वर्ग -२ जमिनीबाबत जिल्हाधिकारी याचे नाहरकत प्रमाणपत्र घेऊन नियोजन प्राधिकारी यांनी विकास परवानगी देणेबाबत आदेश दिलेले आहेत व महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ मध्ये पुढील ४२ अ कलम समाविष्ट केला आहे. रायगड जिल्हयातील जमिनीची विकास परवानगी देण्यासाठी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प.अलिबाग, सिडको प्राधिकरण, मुख्याधिकारी नगरपरिषद हे नियोजन प्राधिकारी आहेत. तसेच प्रस्तूत जमिनीस यापुर्वी तहसिलदार माणगाव यांनी त्यांचेकडील आज्ञापत्र दिनांक १५/६/२०१३ अन्वये सामिलीकरणासह बांधकामास परवानगी दिलेली आहे. आता अर्जदार यांनी वाढीव बांधकानास परवानगी अपेक्षिलेली असल्याने, प्रस्तूत जागेत विकास/बांधकाम परवानगी देण्याचे अधिकार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १८ अन्वये जिल्हाधिकारी यांना आहेत.

वरील अभिप्राय विचारात घेता, श्री.आनंद जगदिशप्रसाद गुप्ता यांना मौजे लोणेरे, तालुका माणगांव येथील स.नं.५१ प्लॉट नं.१ ते ७६ एकूण क्षेत्र ३-०९-३ हे.आर या जागेत निवासी कारणासाठी एकूण प्रस्तावित १६४०४.१२ चौ.मी. बाढीव बांधकामास परवानगी खालील शर्तीवर देण्यात येत आहे.

शर्ती:-

१) महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेल्या प्रादेशिक योजनांसाठीच्या विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.६.८ नुसार पुढीलप्रमाणे तरतूद नमूद असून त्याप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे. सदर रेखांकनात पायाभूत सुविधा जसे अंतर्गत रस्ते, पावसाळी नाले, मलनिसा:रण लाईन व्यवस्था, पाणी पुरवठा, खुल्या जागेचा विकास इ.जबाबदारी मालक व विकासक यांची राहिल. तसेच वरील सर्व सुविधा विकासकाने प्रकल्प पूर्ण होण्यापुर्वी पुर्ण करणे बंधनकारक राहील.

२) वरील जागेचा व नियोजित इमारतीचा वापर नकाशात दर्शविल्याप्रमाणे निवासी/वाणिज्य हॉल व वाणिज्य वापरासाठीची कार्यालये यांचेसाठी करण्यांत यावा व बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे असावे.

३) स्थलदर्शक नकाशावर दाखविल्याप्रमाणे नियोजित बांधकामापासून पुढील, मागील व बाजूचे अंतरे प्रत्यक्षांत जागेवर असली पाहिजेत. त्याखालील जागा कायम खुली ठेवावी.

४) नियोजित बांधकाम नकाशात दर्शविल्यानुसार तळ/स्टिल्ट+४ मजल्याचे बांधकाम यापेक्षा जास्त असु नये.

५) नियोजित इमारतीसाठी आवश्यक असणा-या पाण्याची सोय तसेच सांडपाण्यांची व मैला निर्मूलनाची व्यवस्था नसल्यास प्रत्यक्ष वापरापूर्वी अर्जदाराने केली पाहीजे.

६) नियेजित बांधकामात मंजुरीपेक्षा वेगळे बदल करावयाचे असल्यास किंवा वापर बदलावयाचा असल्यास पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

७) अंतर्गत रस्ते सर्वांसाठी खुले ठेवायेत.

८) प्रकाश व वायुविजन यासाठी ठेवलेल्या खिडक्याचे क्षेत्र हे संबधित खोलीच्या क्षेत्राच्या १/६ पेक्षा कमी असु नये.

९) नियोजित बांधकामामुळे भूखंडावर असलेल्या कोणाच्याही वहिवाटीचा हक्काचा भंग होणार नाही याची जबाबदारी अर्जदार/मालकांने परस्पर घेतली पाहिजे.

१०) रेखांकनामधील भूखंडामध्ये बांधकाम करताना IS CODE-१३९२०-१९९३ भूकंपरोधक RCC डिझाइननुसार बांधकाम घटकांचे नियोजन अर्हताप्राप्त स्ट्रक्चरल इंजिनियर यांचेकडुन करुन घेणे, आवश्यक असून त्यांचे देखरेखीखाली नियोजित इमारतीचे बांधकाम पूर्ण करणे अर्जदार/विकासकर्ता यांचेवर बंधनकारक राहील.

११) जागेवर पर्जन्य जलसंकलनाची व्यवस्था (Rain Water Harvesting System) करणेत यावी.

१२) सदर इमारतींवर सौर उर्जा यंत्रणा (Solar System) बसविणेत यावी.

१३) पुर्वीचे आदेश दि.१५/६/२०१३ मधील अटी बंधनकारक राहतील.

१५) या कार्यालयाकडील आदेश दिनांक १५/६/२०१३ मधील अट, प्रस्तुत रेखांकनातील भू.क्र.१ ते ७६ भूखंड, अंतर्गत रस्ता, खुले क्षेत्र, सुविधा क्षेत्र यांचे महसूल अधिनियमानुसार एकत्रिकरण करण्याची कार्यवाही प्रथम करण्यांत यावी व त्यानुसार भूमी अभिलेख व महसूल दप्तरी दुरुस्ती करुन घेण्यात यावी. त्यानंतरच प्रस्तूत जमिनीत बांधकाम सुरु करावे.

१६) अर्जदार यांनी सादर केलेली माहिती/कागदपत्रे खोटी अथवा दिशाभुल करणारी असल्यास सदर परवानगी रद्द समजण्यात येईल.

१७)मुळ बिनशेती आदेशामधील अटी व शर्ती अर्जदार/जमीनमालक/भूखंडधारक यांच्यावर बंधनकारक राहतील.

१८) रस्त्यापासून नियमाप्रमाणे अंतर सोडून बांधकाम करणे आवश्यक राहील.

१९)भविष्यात सदर जमिनीबाबत/बांधकामाबाबत/हद्दीबाबत/क्षेत्राबाबत/अधिकार अभिलेखा- बाबत मालकीबाबत /पोचरस्त्याबाबत तक्रार/हरकत/न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार/ जमीनमालक यांची राहील.

२०) वरील शर्तींचा भंग केल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यात येईल.

सही/-xxx
(सुमंत भांगे)
जिल्हाधिकारी रायगड
अलिबाग

प्रत:- श्री.आनंद जगदिशप्रसाद गुप्ता रा.लोणेरे, ता.माणगांव,जि.रायगड यांस.
२/- सोबत मंजूर नकाशाची प्रत जोडली आहे.
प्रत:- तहसिलदार माणगांव यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत:- उप अधिक्षक भूमी अभिलेख, माणगांव यांजकडे.
प्रत:- सहाय्यक संचालक, नगर रचना, रायगड-अलिबाग यांजकडे.
प्रत:- तलाठी सजा लोणेरे,ता.माणगांव यांजकडे जरुर त्या कार्यवाहीसाठी.
प्रत:- एल.एन.ए. हॅण्ड फाईलसाठी.

जिल्हाधिकारी रायगड करीता...